बुलढाणा/परभणी/अकोला/वाशिम/जालना/संभाजीनगर/जालना/बीड/नाशिक/पुणे/ठाणे/मुंबई/यवतमाळ/अमरावती.

RNI - MAHMAR/२०२२/८७८८४

शुक्रवार १६ जानेवारी २०२६

दैनिक

# सेवाशक्ती टाईम्स

आपल्या हक्काचे दैनिक

https://www.sewashaktitimes.com | मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड - 9011509831 | कार्यकारी संपादक - गजानन सरकटे - 8605433822 | E-mail: ankoshrathod25@gmail.com

● वर्ष - ३ रे ● अंक - ३०८ ● पाने - ४ ● किंमत - २ रुपये ●

## शिक्षक नसल्याने मोहना खुर्द येथील विद्यार्थ्यांनी गटविकास अधिकाऱ्याच्या दालनात दिला ठिय्या, अखेर शिक्षिकेची नियुक्ती





**सेवाशक्ती टाईम्स.**
**अंकोश राठोड.**

मेहकर : शाळेला शिक्षक नसल्याने आमचे शिक्षण थांबले आहे. शिक्षकाची नियुक्ती करा, अशी मागणी करत तालुक्यातील मोहना खुर्द ( शेंदला) येथील विद्यार्थ्यांनी पालकांसह आज थेट गट विकास अधिकाऱ्यांच्या दालनात धडक देत तिथे ठिय्या दिला.माजी आमदार संजय रायमुलकर यांनी शिक्षकांची त्वरित करण्याची सूचना केली. त्यानंतर शिक्षिकेची नियुक्ती करण्यात आली. मोहना खुर्द येथे १ ते ४ वर्ग असून एक शिक्षकी शाळा आहे.अनेक महिन्यां पासून इथे शिक्षक नसल्याने विद्या र्थ्यांच्या शिक्ष णाचा खोळंबा झाला आहे. १३ जानेवारी रोजी एका शिक्षकाची नियुक्ती शिक्षण विभागाने केली, परंतु सदर शिक्षक रुजुच झाला नाही. त्यामुळे विद्यार्थी व पालकांनी आज मेहकर येथे शिवसेना शिंदे पक्षाच्या कार्याल यात येऊन आपली आपबीती सांगितली. माजी आमदार संजय रायमुलकर यांच्याशी बोलताना विद्यार्थ्यांनी आम्हाला शिक्षक मिळाल्या शिवाय आम्ही घरी जाणार नाही, असे सांगितले. त्यानंतर संजय रायमुलकर यांनी गट विकास अधिकारी श्री खरात यांच्याशी संपर्क साधून कुठल्याही परिस्थितीत सदर शाळेला त्वरित शिक्षक द्या, अशी सूचना केली. नंतर शालेय गणवेश व दप्तरासह आलेल्या विद्यार्थ्यांनी थेट गट विकास अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या दिला व नियुक्त केलेले शिक्षक रुजू झालेले नाही. त्यामुळे तुम्ही आम्हाला नवीन शिक्षक देत नाही तोपर्यंत आम्ही इथून हलणार नाही, असा निर्वाणीचा इशारा दिला. श्री खरात यांनी विद्या र्थ्यांच्या चहा बिस्किटाची व्यवस्था केली. गटशिक्षणा धिकारी श्री वानखेडे यांनी श्रीमती सावळे यांच्या नियुक्तीचा आदेश काढला व त्वरित सदर शाळेवर रुजू होण्याच्या सूचना दिल्या. विद्यार्थ्यांचे पालक संतोष ताकतोडे, सतीश चौरे, संतोष वायाळ,माधव वाघ ,काशीराम चौरे, सतीश चौरे ,रमेश भगवान चौरे, राजेंद्र सावंत, रमेश जंजाळ, शिवशंकर ताकतोडे ,संतोष लाटे ,बजरंग गोवर्धने यांच्यासह इतर नागरिक यावेळी उपस्थित होते. शिक्षिकेची नियुक्ती केल्यामुळे केल्या मुळे विद्यार्थी,पालक यांनी ठिय्या आंदोलन मागे घेतले.

## राहिरी येथे नामांतर लढ्याच्या शहीदांना अभिवादन

### भव्य नामांतर स्मृती सोहळा; शौर्यस्तंभ पूजनाने इतिहासाला उजाळा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**मुन्ना ठाकूर.**



सिंदखेड राजा : मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यासाठी १७ वर्षे चाललेल्या ऐतिहासिक नामांतर लढ्यात बलिदान दिलेल्या शहीदांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी राहिरी (पूल), ताढेगाव फाटा, ता. सिंदखेड राजा येथे १५ जानेवारी २०२६ रोजी भव्य नामांतर स्मृती सोहळा श्रद्धा व संघर्षाच्या भावनेत पार पडला.या लढ्याचे खरे श्रेय शहीद भीमसैनिकांनाच जाते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला मिळावे, यासाठी अनेक ठिकाणी आंदोलने झाली. त्यात राहिरी येथील पूल हा संघर्षभूमीचा साक्षीदार ठरला, जिथे नामांतर चळवळीतील भीम सैनिकांनी बलिदान दिले होते. त्या ऐतिहासिक स्मृती जपण्यासाठी येथे भव्य शौर्यस्तंभ उभारण्याचा संकल्प यावेळी पुन्हा अधोरेखित करण्यात आला. कार्यक्रमात राज्यमंत्री दर्जा प्राप्त भाई जयदीप जोगेंद्र कवाडे, प्रतिभाताई कवाडे, भाई विजय गवई, भाई सावळे यांच्या हस्ते शौर्यस्तंभाचे पूजन करण्यात आले.यावेळी मधुकर शिंदे, प्रवीण गीते, डॉ. ज्ञानेश्वर नागरे, भाई दिलीप खरात. यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.नामांतर लढ्याचा इतिहास सांगताना वक्त्यांनी स्पष्ट केले की, १९७८ साली महाराष्ट्र विधिमंडळाने एकमताने ठराव मंजूर करूनही तब्बल १७ वर्षे संघर्ष करावा लागला, आणि अखेर १४ जानेवारी १९९४ रोजी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ" हे नामांतर झाले. हा विजय कोणत्याही सरकारचा उपकार नसून रस्त्यावरच्या संघर्षातून मिळवलेला हक्क आहे. भविष्यात भीमा-कोरेगावप्रमाणे प्रेरणादायी स्मारक राहिरी येथे उभे राहावे, नवीन पिढीला या संघर्षाची जाणीव व्हावी, यासाठी सर्वांनी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमाला असंख्य भीम सैनिक व आंबेडकरी अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रख्यात कवी अजीम नवाज राही यांनी प्रभावी शब्दांत सूत्र संचालन करून कार्यक्रमाला वैचारिक उंची दिली.नामांतर दिन हा केवळ स्मरणाचा नव्हे, तर सामाजिक न्याय, समता आणि संवि धानिक मूल्ये जपण्याचा निर्धार करण्याचा दिवस आहे, असा संदेश या देण्यात आला.



## प्रा.डॉ.वसंत हंकारे यांनी उलगडलेल्या माय - बापानी अश्रूचे बंध फुटले

### हंबरडा फोडत मुलींनी बापांना कवटाळले; आयोजक सा.कार्यकर्ते मोहन धोटे संचालक संतोषराव तोंडे आणि सरस्वती परिवाराचे भरभरून

**सेवाशक्ती टाईम्स.**
**कृष्णा हावरे.**

बुलढाणा : आई आणि बाप आपल्यासाठी रक्ताचं पाणी करतात, आई ९महिने ९दिवस प्रसव वेदना सहन करून आपल्याला जन्म देते. आपल्यामुळे जर त्यांना खाली मान घालावी लागत असेल तर आपले जगणे व्यर्थ आहे. आई वडिलांना समजून घ्या. त्यांना प्रेमाने मिठी मारा. आपल्याला सर्व ब्रँडेड सोई देणारा बाप फाटके बनियान घालतो. त्याला झोपल्यानंतर बघा. तो कुणासमोर रडत नाही कारण त्याला सर्वच सांभाळून घ्यायचे असते. त्या बापाला समजून घ्या असे मत महाराष्ट्रातील प्रसिद्ध वक्ते डॉ. वसंत हंकारे यांनी मांडले. ते सरस्वती परिवार, जानेफळ येथे आयोजित स्व. तोंडे गुरुजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित व्याख्यानात बोलत होते.अंबिका महिला अर्बनचे संस्थापक अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते मोहन जीवनराव धोटे, संचालक संतोषराव तोंडे व सरस्वती परिवार जानेफळ दे. साखरशा यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई शरदअप्पा मिटकरी, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. वसंत हंकारे, तसेच प्रमुख अतिथी म्हणून सत्य जित परिवाराचे अध्यक्ष श्यामभाऊ उमाळकर, मा परमेश्वर क्षीरसागर उपशिक्षण अधिकारी (मा.) बुलढाणा, रुपालीताई वडणकर, सरपंच जानेफळ, गजाननतात्या कृपाळ मा. सरपंच, मा. डॉ. धनराज राठी अध्यक्ष, अष्टविनायक परिवार जानेफळ, माधवराव आरसोडे जिजामाता परिवार, ही. खुर्द,मा. कैलासभाऊ पैठणकर अध्यक्ष, श्री शिवाजी शी. सं. हिवरा खुर्द,गणेशराव करवंदे मा. उप. कार्य अभियंता,चंदू काका गट्टाणी समन्वय समिती अध्यक्ष ,रामजी सपकाळ अधीक्षक सत्र न्यायालय, बुलढाणा, राजुभाऊ रहाटे अध्यक्ष आ. पा. पाटील संस्था शेंदला, संतोषराव डोमळे अध्यक्ष मा. ए. सो. घाटबोरी व दिनूभाऊ मिटकरी शाळा समिती अध्यक्ष हे उपस्थित होते. मुलींचे लेझीम पथकासह वाजतगाजत मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. सुरवातील महा पुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव श्यामभाऊ गट्टाणी यांनी केले. स्व. तोंडे गुरुजी यांच्या चतुरस्त्र व्यक्तिमत्वावर त्यांनी प्रकाश टाकला. त्यानंतर श्यामभाऊ उमाळकर यांनी अनेक उदाहरणे देत प्रेक्षकांची मने जिंकली. गजानन तात्या कृपाळ व उपशिक्षणा धिकारी क्षीरसागर यांनी कार्य क्रमाला शुभेच्छा दिल्या. सौ. शैला धाबे व ॲड. क्षीरसागर यांच्या ध्वनीफीत एकविण्यात आल्या. त्यानंतर प्रा. डॉ. म्हस्के यांनी वक्त्यांना स्वलिखित पुस्तके भेट दिली. वरिष्ठ लिपिक बसवेश्वर आखाडे यांचा राज्यावर प्रतिनिधित्व करण्यासाठी क्रमांक लागल्या बद्दल सत्कार करण्यात आला.मुख्य वक्ते प्रा. डॉ. हंकारे यांनी व्याख्यानाची सुरुवात हलक्या फुलक्या विनोदांनी करत, हळूहळू त्यांनी सर्व श्रोत्यांच्या मनावर ताबा मिळवला. आपल्या धारदार शब्दातून आणि अमोघ वाणीतून त्यांनी आई-वडील सांगायला सुरुवात केली व पाहता पाहता श्रोत्यांच्या डोळ्यांना आसवांच्या धारा लागल्या. अनेक मुलींनी तर हंबरडा फोडला, आईबाप आपल्यासाठी जीवाचं रान करतात आणि आपण त्यांना पोलीस स्टेशनमध्ये उभे करून त्यांचा अपमान करतो. जोपर्यंत बाप घरात आहे तोपर्यंत त्याला जीव लावा, एकदा आईबाप निघून गेले की जगात कोणीच कोणाचं नसते. कोरडी आणि शुष्क झालेली नाती तुमच्याकडे असलेल्या पैशामुळे तुमच्या जवळ येऊ शकतात. तुमच्यावर खरं प्रेम करू शकत नाहीत म्हणून आई-वडिलांना समजून घ्या. शेवटी हंबरडा फोडत अनेक मुलींनी आपल्या वडिलांना मिठी मारली. सर्व श्रोते भावनिक झाले होते. अशा या अभूतपूर्व कार्यक्रमाचे आयोजन केल्या बद्दल त्यांनी मोहन धोटे पाटील, डॉ. कृष्णा हावरे, संतोषराव तोंडे, संचालक मंडळ व सर्व शिक्षकांचे भरभरून कौतुक केले.त्यानंतर जानेफळ, देऊळगाव साखरशा, हिवरा खुर्द येथील १० शाळांना इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या वतीने पल्स ऑक्सिमीटरचे वाटपअमर राऊत जिल्हा कार्यकारिणी सदस्य इंडियन रेड क्रॉस सोसायटी यांनी केले. इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या वतीने पल्स ऑक्सिमीटरचे वाटप जानेफळ, देऊळगाव साकरशा, हिवरा खुर्द येथील १० शाळांना इंडियन रेड क्रॉस सोसायटीच्या वतीने पल्स ऑक्सिमीटरचे वाटप महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते प्रा वसंत हंकारे , अमर राऊत जिल्हा कार्यकारिणी सदस्य इंडियन रेड क्रॉस सोसायटी बुलढाणा यांनी केले यावेळी मोहन भैया धोटे, संतोषराव तोंडे, प्रा कृष्णा हावरे, सुरेश काठोळे मंटू राजुरकर, विशाल फितवे, सतिष मुरडकर, उमेश सदावर्ते यांच्यासह प्राचार्य, मुख्याध्यापक शिक्षक उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कृष्णा हावरे तर आभार प्रदर्शन संस्थेचे कोषाध्यक्ष श्यामभाऊ मुंदडा यांनी केले. येणाऱ्या सर्व पालकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी सरस्वती शिक्षण समितीच्या वतीने नाश्त्याची व्यवस्था केल्याबद्दल पालकांनी समाधान व्यक्त केले.मोहन धोटे पाटील यांच्या प्रगल्भ सामाजिक जाणिवे बद्दल सुज्ञ नागरिकांमध्ये मोठी चर्चा होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरस्वती परिवार जानेफळ, दे. साखरशा येथील प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. या अभूतपूर्व कार्यक्रमाच्या व्हिडिओ क्लिप प्रत्येकाच्या स्टेटसला दिसत होत्या एवढे मात्र नक्की.

## जवाहर विद्यालयात क्रीडा दिन उत्साहात साजरा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**



जिंतूर : जवाहर विद्यालयात प्रसिद्ध भारतीय फ्रीस्टाईल कुस्तीपटू स्व. खाशाबा जाधव यांची जयंती महाराष्ट्र राज्य क्रीडा दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात स्व. खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्ती पत्रकाचे अनावरण करण्यात आले. या उपक्रमात पूजा नहानाळ, गोपिका मोरे, धनश्री पुंजारे, भक्ती गादेकर यांनी सहभाग घेतला. यानंतर विद्यार्थ्यांनी स्व. खाशाबा जाधव यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. सानिका घुगे, श्रावस्ती लाटे, धनश्री पुंजारे, संबोधी लाटे यांनी विचार मांडले, तर आरती बुधवंत हिने देशभक्तीपर गीत सादर केले. कार्यक्रमात राज्यस्तरीय खेळाडू माही मोरे, अंजली राठोड, नीरज जगताप व कार्तिक गीते यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी नियमित व्यायाम, शिस्त व सातत्यपूर्ण सराव ठेवून क्रीडा क्षेत्रात यश संपादन करावे, असे आवाहन करण्यात आले. कार्य क्रमाचे सूत्र संचालन कल्याण भोसलेनी केले, आभार पी. आर. चव्हाण यांनी मानले. कार्य क्रमाच्या यशस्वी आयोज नासाठी शिक्षक व शिक्ष केतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## तिवसा ग्रामपंचायतची मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत पाहणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अनिस शेख.**





महान : तालुक्यातील तिवसा बु!! ग्रामपंचायत मुख्यमंत्री समृद्ध ग्रामपंचायत राज अभियान. अंतर्गत दि १५ / १ / २०२६ रोजी गावाची पाहणी करण्यात आली यावेळी कार्य क्रमाचे अध्यक्ष स्थानी मुख्य कार्यकारी अधिकारी अकोला अनिता मेश्राम मॅडम हे होत्या, त्यांनी ग्राम तिवसा ग्राम पंचायत आयुष्यमान आरोग्य मंदिर' शाळा येथे भेट दिली मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यक्रमांमध्ये ग्राम तिवसा येथील ग्रामपंचायत सरपंच श्रीमती मंदाताई भारत बहादरे व ग्रामपंचायत सर्व सदस्य व सर्व ग्रामस्थ आयुष्य मान आरोग्य मंदिर विभा गातील कर्मचारी शाळेतील शिक्षक वृंद यांनी सहभाग घेतला गावाचा विकास पाहणी करण्याकरिता माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम मॅडम यांनी भेट दिली गतवर्षी २०२५ ला ग्राम तिवसा यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना मध्ये सहभाग घेऊन ग्राम पंचायतला तिसरा क्रमांक मिळाला होता व गावकऱ्याचा आनंद द्विगुणीत झाला व आता थांबायचं नाही ही संकल्पना मनात घेऊन सरपंच श्रीमती मंदाताई भारत बहादरे यांनी पुन्हा नव्याने सुरुवात करून एकच ध्यास गावचा विकास हेच ध्येय ठेवले व गावाची एका वर्षात जणू कायापालट केली फळा फुलांनी भरलेली स्मशान भूमी गावाचे रस्ते गावाला रस्ता रुंदीकरण रस्त्याच्या कडेला झाडे शाळांमध्ये पाण्याची व्यवस्था मार्गदर्शनपर रंगरंगोटी व मुलांना परसबाग संपूर्ण गावां मध्ये सांड पाण्याची योग्य विल्हेवाट करिता शोषखड्डे पाणी अडवा पाणी जिरवा मार्ग दर्शनपर रंगरंगोटी गुरांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था अशी अनेक कामे श्रीमती मंदाताई यांनी केली व त्यांचे हे कार्य पाहण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम मॅडम उपमुख्य कार्य कारी अधिकारी परिहार, गटविकास अधिकारी पवार, विस्तार अधिकारी इंगळे साहेब इंगळे मॅडम, धुमाळ कृषी विस्तार अधिकारी, भोयर, अनिता भगत अभियंता,यांनी ग्राम तिवसा भेट दिली भेटी दरम्यान संपूर्ण गावाची पाहणी तसेच आयुष्मान आरोग्य मंदिर तिवसा व शाळा अंगणवाडी स्मशानभूमी येथे भेट दिली व कामाची पाहणी करून मॅडमनी समाधान व्यक्त केले गावाची पाहणी करून मॅडम यांनी गावातील ग्रामपंचायत सर्व सदस्य सर्व ग्राम गावातील ग्रामस्थ यांना मार्गदर्शन केले,

# राजमाता राष्ट्रमाता माँ जिजाऊँ माँसाहेब व स्वामी विवेकानंद यांची जयंती पी.एम. श्री.जि.प.शाळा उकळी पं.स.मेहकर येथे साजरी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**





मेहकर : पीएमश्री जि . प . शाळा , उकळी पं. स. मेहकर येथे साजरी करण्यात आली जयंती निमित्त शाळा व्यव स्थापन समिती उकळी चे सदस्य मा. अनंतराव सास वडकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा . राजेशजी अंभोरे होते . सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते माँ जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्य प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्य क्रमाचे प्रास्ताविक श्री के . यु . डोंगरदिवे सर व सूत्रसंचलन श्री. एस. आर. देशमुख सर यांनी केले. विशेष आकर्षण म्हणजे माँ जिजाऊँच्या वेशभूषेमध्ये वर्ग १ ते ८ मधील मुलींनी घेतलेला सहभाग तसेच वर्ग १ ते ८ च्या विद्यार्थ्यांनी माँ जिजाऊँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित विचार मांडले तसेच डी. एस . डव्हळे सर व कु. एन. एम. दिक्षित मॅडम व श्री. जी. एस. अंभोरे मुख्य ध्यापक तथा प्रभारी केंद्रप्रमुख केंद्र उकळी यांनी माँ जिजाऊ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर विचार मांडले कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक वृंद अंगणवाडी सेविका मदतनीस विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन श्री. एस. व्ही. लादे सर यांनी केले व खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# मोरे परिवाराच्या वतीने वान दान व हळदी कुंकवाच्या कार्यक्रमासह तिळगुळ वाटपाचे आयोजनल; शेकडो महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शुद्धोधन खंदारे.**

मंठा : तालुक्यातील देवगाव खवणे येथे दि.१६ जानेवारी गुरुवार रोजी माजी उपसभापती किसनराव मोरे मित्रमंडळाच्या वतीने मकरसंक्रांतीच्या पावन पर्वानिमित्त पारंपरिक वानदान, तिळगुळ वाटप तसेच हळदी-कुंकवाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला गावासह परिसरातील शेकडो महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या माध्यमातून माजी पंचायत समिती सदस्य मीना किसनराव मोरे यांनी मकर संक्रांतीचे सांस्कृतिक महत्त्व विषद करून त्याचे ते जपण्यास सांगितले. महिलां साठी वान दानाचे साहित्य, तिळगुळ, सौभाग्यवस्तूंचे वाटप करण्यात आले. "तिळगुळ घ्या, गोड गोड बोला" या संदेशासह सामाजिक सलोखा, आपुलकी व बंधुभाव






वृद्धिंगत करण्यावर भर देण्यात आला. हळदी - कुंकवाच्या कार्य क्रमामुळे महिलांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण दिसून आले.मोरे परिवाराच्या वतीने महिला व पुरुषांसाठी तिळगुळाचा तर खासकरून महिलां साठी सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविल्याबद्दल ग्राम स्थांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोरे मित्रमंडळ, परिवारातील सदस्यांसह गावातील महिला मंडळांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रम शांततेत व आनंददायी वातावरणात पार पडला.या उपक्रमामुळे मंठा तालुक्यातील ग्रामीण परंपरा, महिलांचे सक्षमीकरण आणि सामाजिक ऐक्य अधोरेखित झाले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. दरम्यान या कार्य क्रमाला मोरे यांच्या मित्र मंडळा सह महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खासगांव येथे मकर संक्रातीचे वाण देण्याकरीता मंदिरात महिलांची गर्दी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**ज्ञानेश्वर गंगावणे.**




जाफराबाद : जाफ्राबाद तालुक्यातील खासगांव येथे मकर संक्रांत निमित्त खासगाव येथे दि.१४ बुधवार रोजी गावातील प्रत्येक मंदिरात महिलांची हळदी, कुंकू व एकमेकींना वाण देण्यासाठी यावर्षी दुपार पासून महीलांची मंदीर परिसरात गर्दी केल्याचे दिसून आले. महीलांनी विविध अलंकार वस्त्रे परीधान करीत हा सण साजरा करतानां दिसत होत्या सूर्य हा मकर संक्रांतीच्या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो.त्यामुळे या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.हा सण मकर संक्रांतीच्या सणाच्या दिवशी बळीराजाच्या शेतातील धनधान्याने भरलेली पिके ही गावातील ग्रामदैवताला अर्पण केली जातात.या धनधाण्याची ओटी भरण्यासाठी कुंभारा कडील छोटी मडके म्हणजे वाणासाठी उपयोग म्हणून वापरले जाते. हे मकर संक्रांतीचे वाण खरेदी करण्यासाठी महिलांनी गुरुवार रोजी बाजारात अलंकार वस्त्रे दागिने लागणारे साहित्य विविध वस्तू खरेदी करतांना महीलांची दुकानात गर्दी केलेली पाहायला मिळाली. यावेळी अनेक महिलांनी बाजारातून हे वाण घरी नेत उद्या मकर संक्रांतीच्या सणाला नेत असलेल्या दिसून आल्याचे पहायला मिळाल्या बुधवार रोजी एकुणच हा सण मोठ्या थाटामाटात महीलांनी एक पर्वणी म्हणून साजरा करतांना दिसुन आल्यातिळगुळ घ्या आणि गोड गोड बोला या जुन्या म्हणीप्रमाणे आजही ग्रामीण भागात ही परंपरा कायमस्वरूपी टिकून आहेत. या दिवशी मोठ्या व्यक्तीकडून लहान व्यक्तींना तिळगुळ देण्याचं एक महत्त्व आहे. आजही आपल्याला पाहायला मिळत आहे. महि लांनी वाण देण्यासाठी शेतातील धान्य जसे तीळ, ऊस, बोरे, गाजर, गहुओंबी ,हरबरा घाटे, जांब, बिब, आदी विविध प्रकारचे सर्व धान्यांनी ओटीचे साहीत्य ताटामध्ये घेऊन महीला मंदी रातील देवी, देवतांना अंगणातील तुलसी वृंदावणाला वाण अर्पण करतानांचे पहायला मिळाल्या एकमेकांना वाण देतांना व ओटी भरतांना खेळ ऊखाण्यांचा रंगतांना पहायला मिळाल्या आपल्या पती देवाच्या नावावर अनेक जणींनी रावांचे ऊखाणे घेत आज हि मकर संक्रांतीचा सण हा दोन दिवस साजरा केला जातो. कडु पणा काढुन तिळ गुळ घ्या आणि गोड गोड बोला या पध्दतीने ग्रामीण भागात साजरा केला जातो.

# शरद जोशी यांच्या 'दो व्यंग्य नाटक' या नाट्य रचनेवर एक दिवसीय राष्ट्रीय आभासी कार्यशाळा संपन्न

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शुद्धोधन खंदारे.**

मंठा : मंठा येथील स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा व श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना यांच्या शैक्षणिक सामंजस्य कराराच्या संयुक्त विद्यमाने एक दिवसीय राष्ट्रीय आभासी कार्यशाळेचे आयोजन १० जानेवारी 'विश्व हिंदी दिवस' महोत्सवा निमित्ताने करण्यात आले होते. या आभासी कार्यशाळेचे उद्घाटन स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा येथील प्राचार्य डॉ. माणिकराव थिटे यांनी केले. अध्यक्षस्थान श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालय, जालना येथील प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव यांनी भूषविले. या आभासी कार्यशाळेच्या प्रमुख वक्ता डॉ.माधुरी राय सहायक आचार्या, हिंदी विभाग श्री राम सुंदर संस्कृत विश्वविद्या प्रतिष्ठान, रमौली दरभंगा (बिहार) यांनी 'अंधों का हाथी' या व्यंग्य नाटकाची राजकीय, सामाजिक आणि वैचारिक दृष्टिकोन या अंगांनी कारण मीमांसा केली. त्यांनी असं ही नमूद केले की आजकाल सर्वसामान्य लोकांचा फक्त वापर केला जातो. आणि हेच या नाटकात चित्रित केले आहे.इंग्रजांच्या काळात जे भारतेंदु हरिश्चंद्र यांनी 'अंधेर




नगरी चौपट राजा' या व्यंग्य नाटकात ब्रिटिश शासनव्यवस्थे विषयी जे व्यंग्य अधोरेखित केले होते. तेच शंभर वर्षांनंतर शरद जोशी यांनी आपल्या वरील व्यंग्य नाटकात शासन व्यवस्थे विषयी अधोरेखित केले. यानंतर मुख्य अतिथी म्हणून डॉ. विदुषी आमेटा सहायक आचार्या , हिंदी विभाग कामेश्वर सिंह दरभंगा संस्कृत विश्व विद्यालय, दरभंगा (बिहार) यांनी शरद जोशी यांच्या 'एक था गधा उर्फ अलादाद खाँ' या व्यंग्य नाटकाची सविस्तर कारण मीमांसा केली. या व्यंग्य नाटकातील नबाब हे पात्र शासनाचे प्रतीक आहे तर कोतवाल हे पात्र प्रशासनाचे प्रतीक आहे. तसेच जनता या दोघांकडे आपल्या समस्या निवारणासाठी मोठ्या आशेने पाहत आहे. असे नमूद केले. प्राचार्य डॉ. जितेंद्र अहिरराव यांनी या आभासी कार्यशाळेचा समारोप आपल्या अध्यक्षीय भाषणाने केला. या कार्य शाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. ज्ञानेश्वर महाजन, प्रा. डॉ. दत्तात्रय गिरी, प्रा. पार्वती देशमुख, प्रा.डॉ.जयश्री वाडेकर, डॉ ममता गुप्ता तसेच प्रा. डॉ. भारत धोत्रे यांनी परिश्रम घेतले. मुख्य वक्ता व प्रमुख पाहुणे यांचे स्वागत व परिचय डॉ. ज्ञानेश्वर महाजन यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.पार्वती देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन डॉ.सीमा गुप्ता यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ.जयश्री वाडेकर यांनी केले. या प्रसंगी दोघं महाविद्याल याचे प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने या आभासी कार्यशाळेत सहभागी झाले होते.

# मनाला अपंगत्व येऊ देऊ नका - जयश्रीताई गीते

**सेवाशक्ती टाईम्स.**
**देवचंद्र समदूर.**

शेगाव : शेगाव येथे रत्नागिरी जिल्ह्यातील १५० दिव्यांग बंधू-भगिनींसाठी प्रेरणादायी दोन दिवसीय सहल दिव्यांग सेवा संस्था, चिपळूण यांच्या वतीने आयोजित दोन दिवसीय सहल अत्यंत उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात पार पडली. या सहलीसाठी शेगाव येथील दिव्यांग सेविका जयश्रीताई गीते यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या सहलीदरम्यान दिव्यांग बंधू-भगिनींना रेल्वे स्थानकावरून सन्मानपूर्वक घेऊन आनंद विसावा येथे आणण्यात आले( संस्थांनी दिलेल्या बस सेवेने) . दोन दिवसांच्या कालावधीत सर्व सहभागी दिव्यांगांना संत गजानन महाराज संस्थान येथे महाराजांचे दर्शन घडविण्यात आले. यावेळी महाप्रसादाचाही लाभ सर्वांना मिळाला. तसेच दिव्यांग बंधू-भगिनींना आनंद सागर येथे फिरवून आनंददायी क्षण




अनुभवण्याची संधी देण्यात आली.सहलीच्या निमित्ताने सायंकाळी सहविचार सभा आयोजित करण्यात आली. या सभेमध्ये जयश्रीताई गीते यांनी उपस्थित दिव्यांगांना संबोधित केले. त्यांनी आत्मविश्वासाने जगणे, स्वाभिमानाने उभे राहणे, एकीचे बळ ओळखणे, हसत,प्रेम व आनंदाने जीवन जगणे तसेच समाजात वावरताना छोटे-मोठे उद्योग उभे करून स्वावलंबी होणे या विषयांवर मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी दिव्यांग बंधू-भगिनीं मध्ये नवचैतन्य निर्माण झाले.या उपक्रमा दरम्यान रेल्वे स्थानकावर दिव्यांगांना चढण्या व उतरण्यासाठी संबंधित गाडी नियोजित वेळेपेक्षा पंधरा मिनिटे अधिक थांबविण्यात आली. याबद्दल प्रवासी संघटना व रेल्वे प्रशासनाचे सौ. अश्विनी भुस्कुटे व श्री.अशोक भुस्कुटे (सहलीच्या आयोजक) यांच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.परतीच्या प्रवासाच्या वेळी दिव्यांग बंधू-भगिनींना प्रेमाची शिदोरी देण्यात आली. जयश्रीताई गीते यांच्या या प्रेमळ व सेवाभावी कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. यावेळी बोलताना जयश्रीताई गीते म्हणाल्या की, "दिव्यांगांची व समाजातील गरजू घटकांची सेवा हाच माझा जगण्याचा मार्ग आहे."या सहलीबद्दल दिव्यांग सेवा संस्था, चिपळूण येथील संस्थापक, पदाधिकारी व दिव्यांग बांधवांनी संत गजानन महाराज संस्थान शेगाव तसेच दिव्यांग सेविका जयश्रीताई गीते यांच्या सेवाकार्याचे मन:पूर्वक कौतुक करत आभार मानले.

# ज्ञानेश्वर विद्यालय जिंतूरची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

## महाबळेश्वर ते परळी वैजनाथपर्यंत विद्यार्थ्यांना ऐतिहासिक, भौगोलिक व धार्मिक वारशाचा प्रत्यक्ष अनुभव

**सेवाशक्ती टाईम्स.**
**भागवत चव्हाण.**




जिंतूर : विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडावा, ऐतिहासिक-भौगोलिक ज्ञानात भर पडावी तसेच अभ्यासातील तणावातून काही काळ मुक्ती मिळावी, या उद्देशाने ज्ञानेश्वर विद्यालय, जिंतूर यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आयो जित शैक्षणिक सहल नुकतीच उत्साहात व सुरक्षिततरीत्या पार पडली. दि. ७ जानेवारी रोजी सायं काळी विद्यालयातून म. रा. प. मंडळाच्या बसने सहलीस प्रारंभ झाला. शिक्षक व शिक्ष केतर कर्म चाऱ्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. या सहलीत महा बळेश्वर, प्रतापगड, गणपती पुळे, कोल्हा पूर, नरसोबाची वाडी, पंढरपूर, तुळजापूर व परळी वैजनाथ या ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटन स्थळांचा समावेश होता. महाब ळेश्वर येथील टायगर पॉईंट, वेण्णा सरोवर, घनदाट जंगल व सह्याद्री पर्वतरांगांचे निसर्गसौंदर्य पाहून विद्यार्थी भारावून गेले. प्रतापगड किल्ल्या वरील भवानी मातेचे मंदिर, बुरुज व कडे पाहताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची जाणीव झाली. गणपती पुळे येथे समुद्र किनाऱ्याचा मनमुराद आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. कोल्हापूर येथील शाहू पॅलेसचा ऐतिहासिक वारसा व महालक्ष्मी मंदिराचे दर्शन विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले. पुढे पंढरपूर येथे विठ्ठल दर्शन, तुळजापूर येथे तुळजा भवानी मातेचे दर्शन तसेच परळी वैजनाथ येथे बाराव्या ज्योति र्लिंगाचे दर्शन घेण्यात आले. सहलीचे नियोजन सुहास राठोड यांच्या नेतृत्वाखाली विनोद चव्हाण, संतोष टारपे, ज्ञानेश्वर येसके, सुदर्शन कानडे, पायल पुरोहित आदींच्या सहकार्याने उत्तमरीत्या पार पडले. मुख्या ध्यापक वाघ व पर्यवेक्षक नरहरी घुले यांच्या मार्ग दर्शना खाली ही सहल यशस्वी ठरली.

# मकर संक्रांतीनिमित्त सोनाळा पोलीस स्टेशनचा स्तुत्य व संवेदनशील उपक्रम

**सेवाशक्ती टाईम्स.**
**शेख कदीर भाई.**

सोनाळा : पोलीस स्टेशन मार्फत मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर नायलॉन मांजामुळे दुचाकी धारकांच्या जीवाला व गाड्यांना होणाऱ्या धोक्याची दखल घेत सोनाळा पोलीस स्टेशनच्या वतीने एक अत्यंत स्तुत्य व समाज हिताचा उपक्रम राबवण्यात आला.या उपक्रमा अंतर्गत नायलॉन मांजापासून होणारे अपघात टाळण्यासाठी दुचाकी वाहनां साठी तारांचे संरक्षणात्मक गार्ड तयार



करण्यात आले. विशेष म्हणजे हे गार्ड पोलीस कर्मचाऱ्यांनी स्वत:च्या हाताने बनवून दुचाकी धारकांना मोफत बसवून दिले.या उपक्रमाचे नेतृत्व सन्माननीय ठाणेदार संदीपजी काळे साहेब, शिंबरे साहेब तसेच सोनाळा पोलीस स्टेशनमधील सर्व पोलीस अधिकारी व कर्म चाऱ्यांनी केले. केवळ कायदा-सुव्यवस्था राखणेच नव्हे, तर नागरिकांच्या जीवित सुरक्षेची काळजी घेणारा हा उपक्रम पोलीस - जनता नात्यातील संवेदन शीलतेचे उत्तम उदाहरण ठरला. सोनाळा पोलीस स्टेशनच्या या पुढाकारामुळे नागरिकां मध्ये समाधान व सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, अशा उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.या समाजोपयोगी व मानवतावादी उपक्रमाबद्दल सोनाळा पोलीस स्टेशनचे मन:पूर्वक आभार व धन्यवाद!

# शीख बांधवांची अखंड लंगर सेवा

**सेवाशक्ती टाईम्स.**
**अकोला प्रतिनिधी.**

अकोला : श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागमाचा मोठा कार्यक्रम या निमित्ताने नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ या काळात होणार आहे. याच्या आयोजनात महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला आहे.शीख समाजाची उभारणी सामुदायिक आणि निस्वार्थ सेवा कार्यावर आधारित आहे. यामध्ये लंगर सेवा, गुरुद्वारा सेवा, शिक्षण व युवा विकास तसेच आपत्तीच्या काळात मदत यांचा प्रामुख्याने समावेश आहे.लंगर सेवा खऱ्या अर्थाने वेगळ्या प्रकारची सेवा आहे. एकता, समानता योच दर्शन आपण होईल प्रत्येक व्यक्ती स्वयं सेवक होवून जेवण बनविण्या काम होते. अगदी भांडी स्वच्छ करण्या साठी स्वयंसेवक होण्या साठीही सर्व जण पुढाकार घेतात.

दैनिक सेवाशक्ती टाईम्स, यह समाचार पत्र के मुद्रक राम प्रिंटिंग प्रेस तहसील चौक मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा प्रिंट करके प्रकाशक मालक अंकोश जानु राठोड द्वारा दैनिक सेवाशक्ती टाईम्स कार्यालय राजीव गांधी कॉम्प्लेक्स मेहकर तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा ४४३३०१ महा, यहा, प्रकाशित किया दैनिक सेवाशक्ती टाईम्स प्रकाशक मालक संपादक अंकोश जानु राठोड यह पीआरबी अक्ट के तहत समाचार चयन के लिये संपादक सहमत है ऐसा नही, सभी विवाद मेहकर न्यायालय अंतर्गत संपादक अंकोश जानु राठोड मो, 9011509831 Title code :- MAHMAR52107 Dainik Sevashakti Times, Printer of this Newspaper Ram Printing Press Tehsil Chowk Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha, Printed and Published by Publisher Proprietor Ankosh Janu Rathod Dainik Sevashakti Times Office Rajiv Gandhi Complex Mehkar Taluka Mehkar District Buldhana 443301 Maha Dainik Sevashakti Times Publisher Proprietor Editor Ankosh Janu Rathod This editor agrees for selection of news under PRB Act No, all disputes under Mehkar Court Editor Ankosh Janu Rathod Mo, 9011509831
Title code :- MAHMAR52107

# आमदार सिद्धार्थ खरात यांनी हिवाळी अधिवेशनात मागणी मांडूनही निर्णय प्रलंबित

## शेतातील सोलर साठी शेतीची अट रद्द करण्यावर शासनाची उदासीनता

## शेतकऱ्यांत नाराजी; तातडीच्या निर्णयाची जोरदार मागणी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**विनोद पाटील तेजनकर.**

वडगांव तेजन : वडगांव तेजन ता. लोणार राज्याच्या हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न सभागृहात उपस्थित करण्यात आला असतानाही त्यावर कोणतीही ठोस उपाययोजना न झाल्याने शेतकरी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शेतातील सोलर पंप व सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी लावण्यात आलेली शेतीची अट रद्द करण्यात यावी, अशी ठाम मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी अधिवेशनात मांडली होती. मात्र अधिवेशन संपून बराच कालावधी उलटूनही शासनाकडून याबाबत कोणताही स्पष्ट निर्णय किंवा शासन आदेश जाहीर झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले असून शासनाच्या भूमिकेबाबत संभ्रम कायम आहे. राज्यातील बहुतांश भागांत शेती साठी वीजपुरवठा अनियमित असून भारनियमना मुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. सिंचनासाठी वीज उपलब्ध नसल्याने पिके धोक्यात येत असून उत्पादन खर्चही वाढत आहे. या पार्श्वभूमीवर सोलर पंप व सौर प्रकल्प हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि दीर्घकालीन उपाय मानला जात आहे. सोलरमुळे वीजेवरील अवलंबित्व कमी होते, सिंचन वेळेवर होते आणि शेतकऱ्यांचा खर्चही वाचतो. मात्र सोलर प्रकल्प उभारणीसाठी लावण्यात आलेल्या शेतीच्या अटींमुळे अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहत आहेत. विशेषतः लहान व मध्यम शेतकऱ्यांना या अटींचा मोठा फटका बसत आहे. जमिनीच्या नोंदी, क्षेत्रफळ, शेतीच्या वापरा संबंधी अटी



आणि विविध तांत्रिक अडचणींमुळे अर्ज प्रक्रिया क्लिष्ट बनली आहे. परिणामी शासनाच्या सौर योजनांचा लाभ मोजक्याच शेतकऱ्यांपर्यंत मर्यादित राहतो, अशी स्थिती आहे. हीच बाब लक्षात घेऊन आमदार सिद्धार्थ खरात यांनी हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांची व्यथा सभागृहात मांडली होती आणि शेतीची अट रद्द करून सोलर योजना अधिक सुलभ करण्याची मागणी केली होती. मात्र या विषयावर केवळ चर्चा होऊनही प्रत्यक्षात कोणताही धोरणात्मक निर्णय न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. अधिवेशनात प्रश्न मांडले जातात, आश्वासने दिली जातात; पण निर्णय आणि अंमलबजावणी होत नाही, अशी भावना शेतकरी वर्गात बळावत आहे. सोलर साठीची शेतीची अट रद्द झाली तर हजारो शेतकऱ्यांना थेट फायदा होईल, सिंचन सुलभ होईल आणि शेती उत्पादनात वाढ होईल, असा शेतकऱ्यांचा ठाम विश्वास आहे. दरम्यान, शेतकरी संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही शासनावर टीका करत तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. एकीकडे शासन हरित ऊर्जा आणि स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन देत असल्याचे सांगते, तर दुसरीकडे अशा अटी लावून शेतकऱ्यांच्या मार्गात अडथळे निर्माण केले जात आहेत, असा आरोप केला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासन गांभीर्याने पाहत नसल्याची भावना अधिक तीव्र होत आहे. आता शासनाने विलंब न करता शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून शेतातील सोलरसाठी असलेली शेतीची अट रद्द करावी, स्पष्ट व ठोस शासन निर्णय काढावा आणि सौर योजनांची अंमल बजावणी सुलभ करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा हा प्रश्न केवळ अधिवेशनातील चर्चे पुरताच मर्यादित राहील शेतकऱ्यांची निराशा आणखी वाढेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# ॲड.राजेश लक्ष्मणराव दाभाडे यांची डॉ.अण्णा भाऊ साठे क्रांती सेना बुलढाणा जिल्हा संपर्क प्रमुख पदी नियुक्ती

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

मेहकर : डॉ. अण्णा भाऊ साठे क्रांती सेना महाराष्ट्र राज्य (A.B.S. KRANTI FORCE) संघटनेच्या बुलढाणा जिल्हा संपर्क प्रमुख पदी ॲड. राजेश लक्ष्मणराव दाभाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामाजिक चळवळीत त्यांनी दिलेले भरीव योगदान तसेच समाज विषयी असलेली आपुलकीची भावना लक्षात घेऊन संघटनेच्या वरिष्ठांच्या



विचारांती व अनुमती नुसार ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. संघटनेची विचार धारा तळागाळा पर्यंत पोहो चवून प्रत्येकाच्या मनात संघटने बद्दल आपुल कीची भावना निर्माण करण्यासाठी ॲड. दाभाडे तन-मन-धनाने कार्य करतील, असा विश्वास संघटनेच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. पीडित, उपेक्षित व वंचित समाज बांधवांना न्याय मिळवून देण्या साठी ते सक्रिय भूमिका बजा वतील, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली. सदर नियुक्ती नियुक्तीपत्र प्रदान केल्याच्या तारखेपासून पुढील एक वर्षाच्या काला वधीसाठी करण्यात आली असून, या निवडी बद्दल विविध स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# दादाराव उकर्डा हिवराळे यांचे दुःखद निधन

**सेवाशक्ती टाईम्स.**
**खामगाव प्रतिनिधी**

खामगाव : तालुक्यातील बोथाकाजी येथील रहिवासी तसेच पुणे येथे वास्तव्यास असलेले दादाराव उकर्डा



हिवराळे यांचे १४ जानेवारी रोजी पहाटे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५३ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, तीन बहिणी, नातवंड असा मोठा आप्त परिवार आहे.

# स्मशानभूमी दुर्घटना पूर्वीच इशारा ठरला निर्णायक!

## सरपंच डॉ.विजय पाटील तेजनकर यांच्या पाठपुराव्याने महावितरण ची धावपळ

## दैनिक सेवाशक्ती टाईम्स बातमी ची महावितरण ने घेतली दखल

**सेवाशक्ती टाईम्स.**
**विनोद पाटील तेजनकर.**

वडगांव तेजन : वडगांव तेजन (ता. लोणार) येथील स्मशान भूमीतून जाणाऱ्या महावितरणच्या जीर्ण व धोकादायक वीज तारा व वाकलेल्या खांबांमुळे कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली होती. स्मशान भूमी सारख्या अतिशय संवेदनशील ठिकाणी कमी उंचीवर लटकलेल्या तारा म्हणजे अक्षरशः मृत्यूला खुले आमंत्रण असल्याची भावना ग्रामस्थां मध्ये तीव्र होत होती. या गंभीर प्रश्नाकडे सरपंच डॉ. विजय पाटील तेजनकर यांनी वेळोवेळी महावितरण चे लक्ष वेधले होते. संभाव्य जीवित हानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण वर राहील व संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, असा ठाम इशाराही त्यांनी दिला होता. मात्र सुरुवातीला तक्रारींकडे दुर्लक्ष झाल्याने





दैनिक RNI:MAHMAR/2022/87884
सेवाशक्ती टाईम्स
मुख्य संपादक - अंकोश जानु राठोड | 9011509831

स्मशानभूमीत मृत्यूला खुले आमंत्रण ! 11 के.व्ही. वीज खांब झुकलेला, तार जीर्ण – महावितरण झोपेत.

सरपंचांचा थेट आरोप : दुर्घटना झाली तर महावितरण वर च गुन्हा दाखल होईल.

सेवाशक्ती टाईम्स.
विनोद पाटील तेजनकर.

वडगांव तेजन (ता. लोणार): ग्रामपंचायत वडगाव तेजन च्या स्मशानभूमीत 11 के.व्ही. क्षमतेचा वीज खांब पूर्णपणे झुकलेला असून तो केव्हा ही कोसळण्याच्या अवस्थेत आहे. त्याचप्रमाणे या वीज वाहिनीवरील तार पूर्णतः जीर्ण, अवस्थेत असून कोणत्याही क्षणी तुटून भीषण दुर्घटना घडू शकते.मृतांच्या शेवटच्या प्रवासाच्या ठिकाणीच असा चालता-बोलता मृत्यूचा सापळा असताना महावितरण प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.या धोक्या बाबत महावितरणकडे वारंवार तक्रारी, लेखी निवेदने देऊनही आजपर्यंत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. दुर्घटना घडण्याची च वाट पाहिली जात आहे का, असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.स्मशानभूमी हा अत्यंत संवेदनशील परिसर असून अंत्यसंस्काराच्या वेळी महिला, वृद्ध, लहान मुले मोठ्या संख्येने उपस्थित असतात. अशा ठिकाणी उच्चदाब वीज वाहिनीची ही अवस्था म्हणजे थेट माणसांच्या जीवाशी खेळ आहे.यासंदर्भात डॉ. विजय पाटील तेजनकर, सरपंच – ग्रामपंचायत वडगाव तेजन यांनी कार्यकारी अभियंता, विद्युत महावितरण कार्यालय, लोणार यांना थेट इशारा दिला आहे. खांब तात्काळ बदलणे, नवीन सुरक्षित खांब उभारणे व जीर्ण 11 के.व्ही. तार तत्काळ बदलण्याची त्यांनी ठाम मागणी केली आहे. भविष्यात या ठिकाणी कोणतीही अपघाती घटना किंवा जीवितहानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी महावितरण विभागाची च राहील व संबंधित अधिकाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही सरपंचांनी दिला आहे.महावितरणच्या निष्क्रिय, बेफिकीर आणि संवेदनाहीन कारभारा विरोधात ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप असून तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलन, घेराव व रास्ता रोको करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

02 Jan 2026 - Page 4 | sewashaktitimes.com
Powered by softisky | 9764331134

नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता. दरम्यान, या धोकादायक परिस्थि तीवर दैनिक सेवाशक्ती टाईम्स या वृत्तपत्रात सविस्तर बातमी प्रसिद्ध करण्यात आली. या बातमी मुळे विषयाला व्यापक प्रसिद्धी मिळून प्रशासनावर दबाव वाढला. अखेर दैनिक सेवाशक्ती टाईम्स मध्ये लावलेल्या बातमीची दखल घेत महावितरण प्रशासन जागे झाले. संबंधित अधिकाऱ्यांनी स्मशानभूमी त प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने कारवाई करत वाकलेला खांब बदलला तसेच जीर्ण व धोकादायक वीजतारा काढून नवीन तारा बसवण्यात आल्या. या कारवाईमुळे दीर्घ काळा पासून निर्माण झालेला जीव घेणा धोका टळला असून स्मशान भूमीत येणाऱ्या नाग रिकांची सुरक्षितता सुनिश्चित झाली आहे. सरपंचांच्या ठाम भूमिके बरोबरच प्रसार माध्य मांनी विषय उचलून धरल्या मुळे प्रशासनाला हालचाल करावी लागली, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थां कडून व्यक्त होत आहे. भविष्यात अशा संवेदनशील ठिकाणी नियमित तपासणी करून अपघात होण्या पूर्वीच प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात, अशी मागणी नागरिकां कडून होत आहे.

# बार्शीटाकळी तहसील कार्यालयाच्या आशीर्वादाने रेतीचे अवैध उत्खनन व बेकायदेशीर विटभट्ट्या सुरू?

**सेवाशक्ती टाईम्स.**
**प्रदीप गावंडे.**

बार्शीटाकळी : बार्शी टाकळी तालुक्यात अनेक ठिकाणी बेकायदेशीर वीट भट्ट्या सुरु असून जवळच्या मोरगाव काकड येथे रेतीचे मोठ्या प्रमाणात अवैध उत्खनन होत असल्यामुळे बार्शी टाकळी तहसील कार्यालयाच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, या गंभीर बाबीकडे जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष द्यावे,अशी मागणी तालुक्यातील लोकांनी केली आहे, यासंदर्भात पिंजरचे मंडळ अधिकारी यांनी तत्कालीन तहसीलदार यांच्याकडे तसा अहवाल देखील पाठविला आहे, परंतु अजून पर्यंत कारवाई शून्य असल्याचे समजते, बार्शी टाकळी तालुक्यातील पिंजर सर्कल सह अनेक ठिकाणी बेकायदेशीर वीटभट्ट्या सुरु असल्याचे



कळते, याचबरोबर पिंजर पोलीस स्टेशन अंतर्गत असलेले मौजे मोरगाव काकड येथे रेतीची मोठी खान असून नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात रेतीचे अवैधपणे उत्खनन होत आहे, याची माहिती संबंधित मंडळ अधिकारी व तराठ्यांना आहे, परंतु आर्थिक लोभापाई याकडे दुर्लक्ष केल्या जात असल्याचे चर्चा आहे, त्याच प्रमाणे खेर्डा बुद्रुक मंडळामध्ये देखील रेतीचे अवैध उत्खनन होताना दिसून येत आहे, खेडा बुद्रुक मंडळ अधिकारी आणि त्यांचे तलाठी यांचे रेती माफी याशी साठेलोटे असल्याची चर्चा आहे, तहसील कार्यालय मंडळ अधिकारी तलाठी यांच्या सर्वांचे आशीर्वादाने हा गोरख धंदा सुरु असल्याचे चित्र आहे, तत्कालीन तहसीलदार राजेश वझिरे यांनी या सर्वांच्या मुचक्या आवळाल्या होत्या , पिंजर पोलिसांनी सुद्धा अवैध रेती वाहतूक दाराविरुद्ध कारवाई केलेली आहे, परंतु बार्शी टाकळी तहसील कार्यालयाकडून कारवाई का केली जात नाही? हा फार मोठा प्रश्न आहे, पिंजर जवळ असलेले मौजे मोझरी खुर्द येथे बेकायदेशीर वीटभट्ट्या सुरु असल्याचे समजते, या वीटभट्टीचा देखील अहवाल वरिष्ठाकडे गेला आहे, परंतु ठोस कारवाई होत नसल्याने तहसीलदार, तहसील कार्याल यातील कर्मचारी यांचे कार्य प्रणालीवर एक प्रश्नचिन्ह उभा राहत आहे, तालुक्यातील अनेक ठिकाणावरुन रेतीचे अवैध उत्खनन होत असल्याने निसर्गाचा ऱ्हास होत, तर दुसरीकडे महसूल विभागाला फार मोठा गंडा बसत आहे, तरी देखील मंडळ अधिकारी आणि तलाठी हे संबंधिताविरुद्ध कारवाई करण्यासाठी असमर्थ असल्याचे चित्र दिसत आहे, त्यामुळे संबंधित तहसीलदार यांनी या गंभीर बाबीकडे लक्ष देऊन हा नंगानाच बंद करावा, अशी गावकऱ्यांची मागणी आहे, वास्तविकता, जिल्ह्याला जिल्हा धिकारी म्हणून एक चांगले नेतृत्व लाभले आहे, परंतु जिल्हाधिकारी यांच्या माघारी हे सर्व प्रकार सुरु असल्यामुळे प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# जिजामाता हॉस्पिटल व नेत्रालयलयाला जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांची भेट

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान देशमुख.**

सिंदखेडराजा : बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी मराठा सेवा संघ द्वारा संचालित जिजामाता हॉस्पिटल व नेत्रालयला भेट देऊन रुग्णाल यातील आरोग्यसेवा, वैद्यकीय सुविधा तसेच रुग्णालयातील विविध विभागांना भेट देत कामकाजाचा आढावा घेतला. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वप्रथम बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, औषध वितरण कक्ष, प्रयोगशाळा तसेच नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया विभागाची पाहणी केली. व रुग्णालयाच्या माध्यमातून चालू असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांबाबत समाधान व्यक्त करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जिजामाता हॉस्पिटल व नेत्रालयालय मागील चार वर्षांपासून ग्रामीण भागात गरजू रुग्णांना अल्प दरात मोतिबिंदू शस्त्रक्रिया, दर्जेदार आरोग्य सेवा, मोफत नेत्र तपासणी शिबिर, रक्तदान शिबीरे, निरोगी माझं गाव अभियानांतर्गत आरोग्य तपासणी शिबिरे, महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री मंत्री आरोग्य योजने अंतर्गत सल्ला, मार्गदर्शन व मदत, अपघात ग्रस्त रुग्णांसाठी मोफत रुग्ण वाहिका,दंत विभागाच्या माध्यमातून ओरल कॅन्सर स्क्रीनींग, कॅन्सर तपासणी व



मार्गदर्शन, प्राकृतिक आरोग्य चिकित्सा केंद्राच्या माध्यमातून निसर्गोपचार व योगा,वृक्षारोपण यासह विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात या सर्व उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे, मराठा सेवा संघ राज्य संघटक शिवश्री डॉ.मनोहर तुपकर, जिजाऊ सृष्टी प्रकल्प संचालक शिवश्री इंजी.पुरुषोत्तम कड्,इश्वेद बायोटेकचे संचालक शिवश्री संजय वायाळ, म. से. संघाचे शिवश्री अंगद काळे, सारथ्य फाउंडेशनचे गोपाल देवकर तथा जिजामाता हॉस्पिटल व नेत्राल याचे प्रोजेक्ट मॅनेजर समाधान देशमुख सह हॉस्पिटलचे डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीमुळे जिजामाता हॉस्पिटल व नेत्राल याच्या कामकाजाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# अटाळी प्रिमियर लिग मध्ये LCC Power Hitters दे.साकरशा संघ विजयी

## ग्रामीण भागातील क्रिकेट स्पर्धेत दमदार खेळ करत राखले वर्चस्व

**सेवाशक्ती टाईम्स.**
**नवल राठोड.**

देऊळगाव साकरशा : अटाळी प्रिमियर लिग हि स्पर्धा खामगाव - मेहकर - पातुर तालुक्यातील ग्रामीण भागाच्या खेळाडूंसाठी आयोजित केली होती. या स्पर्धेत ८ संघांमध्ये देऊळगाव साकरशा या संघाने दमदार खेळ करत विजेतेपद पटकाविले आहे. बजरंगी क्रिकेट संघ अटाळी यांच्या वतीने अटाळी प्रिमियर लिग पर्व पहिले दि.११ जाने ते १३ जाने दरम्यान आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण ८ संघामध्ये लिलाव प्रक्रिया करून खेळाडू संघानी ताफ्यात निवडले होते. दरम्यान या स्पर्धेत अंतिम सामन्यात L C C पॉवर हिटर्स संघाने



नाणेफेकी जिंकत ८ षटकात पवन जाधव नाबाद २८ चेंडूत ८८ धावांची वादळी खेळी व सुनिल ठक नाबाद २० चेंडूत ५६ धावा करत बिनबाद १४७ धावांचा डोंगर उभा केला. या लक्ष्याचा पाठलाग करताना ८१ धावांपर्यंतच अंगद वॉरियर्स संघाला मजल मारता आली आणि अंगद वॉरियर्स या संघावर L C C पॉवर हिटर्स संघाने एकतर्फी विजय संपादन केला. या सामन्याचा सामना वीर ग्रामीण भागाचा उभरता सितारा पवन जाधव राहिला. हा विजय संघाचे कर्णधार सुनिल पाचपोर यांच्या नेतृत्वाखाली संघाने प्राप्त केला. तसेच सेमी फाइनल मध्ये अटीतटीच्या लढतीत कर्णधार सुनिल पाचपोर यांनी घातक गोलंदाजी करत शौर्य-११ या संघासमोर देऊळगाव साकरशा या संघाला विजयी केले होते. या स्पर्धेत संघातील धिरज जाधव या युवा खेळाडूने सुद्धा प्रेक्षकांना प्रभावित करणारा खेळ केला. याव्यति रिक्त ॲड. अजय देशमुख, ओम सोनुने, महादेव पाचपोर, दिपक रंजवे, विनय राठोड,वैभव टेकाळे, साजिद देशमुख, गोपाल बगेवार, संकेत इंगळे, नागेश, दर्शन बघे या खेळाडूंनी सुद्धा विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. या विजया नंतर देऊळगाव साकरशा गावात भव्य मिरवणुक काढत जल्लोष करण्यात आला. तसेच या विजयानंतर संघाचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक केल्या जात आहे.

# अंजनी बु.येथे स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ जयंती उत्साहात साजरी

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**



अंजनी बु : मेहकर दि १३ तालुक्यातील अंजनी येथील महात्मा फुले व्यायामशाळा व स्व. दत्तात्रय सखाराम पायघन सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष किशोर गारोळे होते. यावेळी त्यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांचे आत्मचरित्र वाचन केल्यामुळे व्यक्तिमत्त्व विकास व प्रगल्भता वाढते, असे मत व्यक्त केले. अभ्यास करताना निराशा आल्यास डोळे बंद करून आपल्या आई-वडिलांचे कष्ट आठवावेत, तेच प्रत्येकासाठी एक मोठे प्रेरणास्थान आहे. या प्रेरणे मुळेच मी यशस्वी झालो, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी उपस्थित युवकांना दिला. यानिमित्ताने मेहकर शहराचे नव निर्वाचित नगराध्यक्ष किशोर गारोळे यांचा सत्कार वाचनालयाचे अध्यक्ष गजानन पायघन यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नगरसेवक नितीन तुपे यांचा सत्कार संतोष लाड यांनी तर नगरसेवक महेश रिढे यांचा सत्कार विश्वनाथ चवाळे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन विलास पायघन यांनी केले, तर आभार प्रदर्शन महात्मा फुले व्यायामशाळेचे अध्यक्ष गजानन पायघन यांनी मानले. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख निबाजी पांडव, विलास शिंदे, वाचनाल याचे संचालक विश्वनाथ चवाळे, संतोष लाड, भागवत पुंड, अरुण लाड, प्रतिक पायघन, अश्विन साबळे, विशाल पायघन, विठ्ठल ढोले, राजू तडस, संतोष नेहुल, सतिश खडसे, अभय पायघन, विनोद ढोले, हरिभाऊ अवचार, हनुमान चंदनशिव, नागनाथ पुंड तसेच गावातील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मेहकरच्या उपनगराध्यक्षपदी 'अलीम ताहेर' बिनविरोध



**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**

मेहकर : मेहकर नगर पालिकेच्या उपनगराध्यक्षपदी काँग्रेस पक्षाचे अलीम ताहेर यांची बिनविरोध निवड झाली. पालिकेच्या सभागृहात मंगळ वारी ही प्रक्रिया पार पडली. नवनिर्वाचित नगर सेवक, नगराध्यक्ष किशोर गारोळे आणि पालिकेचे मुख्याधिकारी रामराजें कापरे यांच्या उपस्थितीत ही निवडणूक झाली. काँग्रेस ११ सदस्यसंख्या असल्याने उपनग राध्यक्ष पदासाठी काँग्रेसचे उमेदवार अलीम ताहेर यांचे नांव जाहीर करण्यात आले. या वेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे महेश रिंढे यांची उमेदवारी दाखल करण्यात आली होती. मात्र नंतर त्यांनी माघार घेतली. त्यामुळे अलीम ताहेर यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली.

**स्वीकृत सदस्य निवडही बिनविरोध!**

या वेळी कांग्रेस कडून माजी नगराध्यक्ष कासम गवळी व शिंदे गटाकडुन माजी उपाध्यक्ष अजय उमाळकर, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे अमर घोडे निवड करण्यात आली.

**आमदार सिद्धार्थ खरात, नगराध्यक्ष किशोर गारोळेनी दिले कार्यकर्त्यांना न्याय!**

मेहकर नगर पालिकेच्या सभागृहात मंगळवारी उपाध्यक्ष व स्वीकृत सदस्य निवडीसाठी नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी विशेषसभा बोलावली होती. या सभेत उपाध्यक्ष सह स्वीकृत नगर सेवकांची निवडणूक बिनविरोध झाली या निवडणुकीत विशेष म्हणजे काँग्रेस आणि शिवसेना शिंदे गट यांच्याकडून माजी नगराध्यक्ष कासम गवळी व माजी उपाध्यक्ष अजय उमाळकर यांना स्वी कृत सदस्य म्हणून निवडण्यात आले. मात्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे पक्षासाठी निष्ठेने काम करणारे कार्यकर्ते अमर घोडे यांना स्वीकृत सदस्य पदी निवडल्या बद्दल खरा कार्य कर्त्यांचा सन्मान करण्यात आला व कार्यकर्त्याला कार्याची पावती म्हणून न्याय देण्यात आला एवढे मात्र खरे.

## कामबंद मोडीत!

## शिवसेना नगराध्यक्ष किशोर गारोळेंचा धडाका

# रात्री साडेनऊला नपाचे दालन उघडले; सफाई कामगारांचे प्रश्न जागीच निकाली

**सेवाशक्ती टाईम्स.**
**गजानन सरकटे.**



मेहकर : शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर वळणावर असतानाच, नवोदित शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी पदभार स्वीकारताच धडाकेबाज निर्णय घेत सफाई कामगारांचे कामबंद आंदोलन मोडीत काढले. संक्रांत सणाच्या दिवशीही रात्री साडेनऊ वाजता नगरपरिषद उघडून घेतलेली तातडीची बैठक ही त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, संवेदनशीलता व नेतृत्वगुणांची ठळक साक्ष ठरली आहे.०१ डिसेंबर पासून पगार न मिळणे, वेळेवर वेतन न होणे, कपात करणे तसेच हातमोजे, सॅनिटायझर, बूट यांसारखी सुरक्षा साधने न पुरविल्याने शहरातील सफाई कामगारांनी कामबंद आंदोलन छेडले होते. त्यामुळे शहरातील स्वच्छता धोक्यात आली होती. अशा परिस्थितीत नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी स्वतः पुढाकार घेत सफाई कामगारांशी थेट संवाद साधला.कामगारांच्या व्यथा ऐकून घेताना नगराध्यक्ष गारोळे यांनी ठाम शब्दांत सांगितले, "तुमचे आरोग्य आमच्यासाठी सर्वोच्च आहे. तुम्हाला काही झाले तर तुमचे कुटुंब उघड्यावर पडेल. अशा हलगर्जीपणाला अजिबात माफी नाही." नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी १५ जानेवारी रोजीच सर्व सफाई कामगारांच्या खात्यात पगार जमा होईल, असे ठोस आश्वासन दिले. तसेच, "तुम्हीही या नगरपरिषदेचे नगराध्यक्षच आहात. कुठलीही अडचण असेल तर रात्री १ वाजताही मी व माझे सहकारी तत्काळ दखल घेऊ," असे सांगत कामगारांचा विश्वास संपादन केला.या ठाम भूमिकेनंतर सफाई कामगारांनी टाळ्यांच्या गजरात नगराध्यक्ष किशोर गारोळे यांचे अभिनंदन करत कामबंद आंदोलन मागे घेतले.यावेळी गटनेते विलास चनखोरे, नगरसेवक सतिश ताजने, नगरसेवक महेश रिंढे, निसार अन्सारी, युवा सेना तालुका अधिकारी ॲड. आकाश घोडे, नगरसेवक नितीन तुपे, नगरसेवक अमर घोडे, नारायण पचेरवाल, सुमित धोटे, गोपाळ गायकवाड, यांच्यासह नगर परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.दरम्यान, संबंधित कंत्राटदाराने यापुढे सफाई कामगारांच्या बाबतीत कसलीही हलगर्जी केल्यास कंत्राट रद्द करण्याचा थेट इशारा नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनी दिला. कामबंद आंदोलन मोडीत काढत जनतेच्या प्रश्नांवर ठोस निर्णय घेणारे शिवसेना नगराध्यक्ष किशोर गारोळे हे शहराच्या राजकारणात 'ॲक्शन मोड'मध्ये आल्याचे स्पष्ट झाले आहे.

# डोंगरकिन्ही तांडा येथे कबड्डी चे ५५ किलो वजनाच्या आतील दनदणीत सामने

**सेवाशक्ती टाईम्स.**
**सुनिल आडे.**




मालेगाव : डोंगरकिन्ही तांडा येथे स्व.बाळुभाऊ नाईक कबड्डी संघ डोंगरकिन्ही ता मालेगाव जिल्हा वाशिम यांच्या वतीने कबड्डी चे वन नाईट ५५ किलो आतील वजनी कबड्डी चे सामने आयोजीत करण्यात आले आहे तरी परीसरातील सर्व खेळाडू कबड्डी प्रेमी यांनी येथे येऊन या खेळाची शोभा वाढवावी या सामन्यासाठी प्रथम बक्षीस श्री तुळशीराम बोंद्राजी जोरेवार २१००० / द्वितीय बक्षीस श्री भगवान गोरख बोरकर, सुनिल राव किसनराव देशमुख १५००१ / तृतीय बक्षीस स्व. बाळुभाऊ नाईक कबड्डी संघ व श्री प्रल्हाद गोबरु राठोड ११००१ /, चतुर्थ बक्षीस ५००१/ श्री तुळशीराम किसन राठोड, डिगाबर शिवा जाधव, पंचम बक्षीस ३००१ /स्व राजु राठोड चेलखा, शस्टम बक्षीस २००१ / छत्रपती शासन गणेश मंडळ.असे सहा बक्षीस ठेवण्यात आले आहे एकूण ५६, ००५/ - जंगी लूट ठेवण्यात आले आहे. सामन्याचे उद्धाटक, तुळशीराम बोंद्राजी जोरेवार भगवान गोरख बोरकर सुनील भाऊ किसनराव देशमुख मा सरपंच,वसंता लोभा आडे सरपंच , देवसिंग राठोड नाईक, मानसिंग आडे कारभारी, प्रल्हाद राठोड संतोष राठोड दिगंबर राठोड रंगलाल आडे मधुकर राठोड श्रीराम चव्हाण शिवा जाधव अमरचंद राठोड सुनील राठोड तुळशीराम राठोड सेवाराम आडे तंटामुक्ती अध्यक्ष सामन्याचे रेफ्री, संजय राठोड, निलेश राठोड, नारायण सारडा. संपर्क करण्या साठी अरुन राठोड ९५२९४ १३२७८, गणेश भालेराव ८२६१९० ६०९८, रितेश राठोड ७०५७ ५०३६३०, रामेश्वर आडे ८७६७ ४३०२६९, टिप - हे गाव मालेगाव १० किमी अंतरावर मेहकर रोडवर आहे.

# वसंतराव नाईक महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष निवर्तले

## माजी जि.प.सदस्य प्राचार्य आत्माराम राठोड यांच्या निधनाने शिक्षण व सामाजिक क्षेत्रात हळहळ

**सेवाशक्ती टाईम्स.**
**सुरेश जाधव.**



> **शालिग्राम सवाईराम राठोड, सामाजिक कार्यकर्ता, सावरगांव कान्होबा.**
> **तालुक्यातील गिरोली जि. प. सर्कलचे सदस्य पद भूषविलेले व आमच्यासारख्या बहुजनांच्या मुलांना उच्च शिक्षणाची संधी प्राप्त करून देणारे आमचे मार्गदर्शक गुरुवर्य आत्माराम राठोड सर यांच्या जाण्याने उच्च शिक्षणाचा प्रवाह दोन्ही तालुक्यात प्रवाहित करण्याचे सरांच्या पुणीत कार्यामुळे मी व माझ्यासारख्या अगणित विद्यार्थ्यांचे भाग्य उजळले आहेत.**

मानोरा : तालुक्यातील आसोला निवासी आणि तत्कालीन मंगरूळ नाथ तालुक्यामध्ये समाविष्ट असलेल्या मं.नाथ शहर व तालुक्या सह मानोरा तालुक्यातील बहुजनांच्या मुलांना उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणाची द्वारे खुली करून देणारे माजी प्राचार्य आत्माराम अमरसिंग नाईक यांना दोन दिवसांपूर्वी आपल्यातून काळाने हिरावून नेल्याने शैक्षणिक क्षेत्रात शोक कळा पसरली आहे. ग्रामीण मुखवटा असलेल्या मं.नाथ तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांच्या पाल्यांना तत्कालीन अकोला ह्या खूप लांब पडणाऱ्या जिल्ह्याच्या ठिकाणी जाऊन शिक्षण घेणे आर्थिकदृष्ट्या अवघड व परवडत नसल्याचे तत्कालीन माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या निदर्शनास आणून मं.नाथ ह्या तालुक्याच्या ठिकाणी उच्च माध्यमिक आणि महा विद्यालयीन शिक्षणाची सोय तब्बल ५३ वर्षांपूर्वी १९७२ मध्ये या शिक्षण संस्थेद्वारा उपल करून दिली होती.मं.नाथ शहरातील सध्याच्या दोन नंबर या उच्च प्राथमिक शाळेच्या ठिकाणी प्रारंभी अमर शिक्षण प्रसारक मंडळाची ही शैक्षणिक संस्था प्राचार्य अमर राठोड यांनी पाच वर्षे स्वतःच्या त्यावेळी यशस्वीरित्या बळावर चालवून दाखविली. वसंतराव नाईक कला आणि आत्माराम नाईक वाणिज्य उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षण संस्थेमध्ये उच्च गुणवत्ता असणाऱ्या प्राध्यापक वृंदाची आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक पारदर्शक पद्धतीने करून असंख्य विद्यार्थी घडविण्याचे कार्य मं.नाथ मधे केले ज्याचा लाभ आत्ताच्या मानोरा व मं.नाथ तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांना होऊन ते राज्य आणि केंद्राच्या विविध शासकीय व अशासकीय आस्थापनावर काम करीत असल्याचे प्रकर्षाने पुढे आलेले आहे. मं.नाथ तालुक्याचा मानोरा तालुका त्यावेळी भाग असल्याने सध्याच्या मानोरा तालुक्यातील असंख्य विद्यार्थ्यांच्या जडण घडणी मध्ये या शिक्षण संस्थेने मोठा वाटा उचलला आहे. मं.नाथ शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या ह्या महाविद्याल याच्या जडणघडणी मध्ये माजी प्राचार्य आत्माराम नाईक (राठोड) यांचा वाटा मोलाचा होता. विद्यार्थी हिताला प्राधान्य देणारे व कडक शिस्तीचे प्रशासक म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठा मध्ये दिवंगत माजी प्राचार्य आत्माराम राठोड यांचे नाव लौकिक होते. प्राचार्य आत्माराम नाईक (राठोड) यांचे वार्धक्याने झालेल्या मृत्यूमुळे मानोरा आणि मं.नाथ तालुक्यासह या शिक्षण संस्थेमध्ये ज्ञानार्जन केलेल्या विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबीयां मध्ये शिस्तप्रिय शिक्ष काच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

# फलोत्पादन क्षेत्रासाठी केंद्र-राज्य समन्वयातून ठोस निर्णय; मातृतीर्थ सिंदखेडराजाचा सन्मान

**सेवाशक्ती टाईम्स.**
**समाधान सरकटे.**



सिंदखेडराजा : फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या मार्गदर्शना खाली भारताचे कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांची विशेष कार्य अधिकारी डॉ. दत्तात्रय भिसे व स्वीय सहायक सचिन अंबादास काटे यांनी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत राज्यातील फळबाग लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या, अडचणी व त्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.या चर्चे दरम्यान फळबाग शेतकऱ्यांना अधिक अनुदान देणे, केंद्र शासनाच्या विविध योजनांतून जास्तीत जास्त निधी उपल करून देणे, तसेच आधुनिक तंत्र ज्ञानाच्या माध्य मातून फलोत्पादन वाढविण्या बाबत सकारात्मक भूमिका मांडण्यात आली. केंद्र व राज्य शासनाच्या समन्व यातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्या साठी ठोस निर्णय घेतले जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. विशेष म्हणजे, मातृतीर्थ सिंदखेड राजा तालुक्यातील स्वीय सहायक सचिन अंबादास काटे हे आपल्या कार्यक्षेत्रात अत्यंत उत्कृष्ट वजबाबदारीने काम करत असून त्यांच्या या योगदानामुळे मातृतीर्थ नगरीच्या मानात भर पडत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. त्यांच्या माध्यमातून स्थानिक भागातील शेत कऱ्यांच्या प्रश्नांना केंद्र स्तरावर प्रभावीपणे मांडणी होत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. शेत कऱ्यांच्या हितासाठी शासन कटिबद्ध असून, भविष्यात फलोत्पादन क्षेत्रासाठी अधिक भक्कम व दीर्घकालीन धोरण राबविण्यात येणार असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# जड वाहनांसाठी नवीन पसंती क्रमांक मालिका सुरु

**सेवाशक्ती टाईम्स.**
**बुलढाणा प्रतिनिधी.**



बुलढाणा : उप प्रादेशिक परिवहन कार्यालया मार्फत जड वाहनां साठी पसंती क्रमांका करिता MH२८ CF ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. ही मालिका दि. १९ जानेवारी २०२६ पासून सुरु होणार असून, ०००१ ते ९९९९ पर्यंतचे क्रमांक वाहनधारकांसाठी उपल राहणार आहेत. पसंती क्रमांक घेऊ इच्छिणाऱ्या जड वाहनधारकांनी नियमांनुसार अधिकृत प्रक्रियेद्वारे अर्ज सादर करावा. या सेवेअंतर्गत निश्चित शुल्क आकारण्यात येणार असून, पसंती क्रमांकांचे वाटप शासनाने विहित केलेल्या पद्धतीने करण्यात येईल. इच्छूक वाहन धारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी रघुवीर सिंग बिलावर यांनी केले आहे.

# संगणक अभियांत्रिकी विषयात बोथाकाजी येथील नम्रता गावंडे यांना पीएचडी प्राप्त

**सेवाशक्ती टाईम्स.**
**संदीप राठोड.**



खामगाव : तालुक्यातील बोथाकाजी येथील रहिवासी तसेच सध्या पुणे येथे पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये प्राध्यापक पदावर कार्यरत असलेल्या नम्रता रामदास गावंडे यांनी संगणक अभियांत्रिकी विषयात पीएचडी मिळवली आहे. "क्रॉनिक हार्ट फेल्युअर (CHF) शोधासाठी नाविन्यपूर्ण मल्टी-मोडल ट्रान्सफर लर्निंग तंत्राचे डिझाइन आणि विश्लेषण" हा त्यांचा संशोधनाचा विषय होता.त्यांनी डॉ.दिनेश गोयल, डॉ.कृती सांखला यांच्या मार्गदर्शनाखाली पौर्णिमा युनिव्हर्सिटी जयपुर राजस्थान येथे शोध प्रबंध सादर केला होता. पौर्णिमा युनिव्हर्सिटी जयपूरने त्यांना नुकतीच पीएचडी जाहीर केली आहे. त्यांच्या या यशामुळे परिसरामध्ये त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.